MHNG150018422008

**नि.फौ.ख. क्र. १५९८/२००८ मधील नि.क्र.०१ वरील आदेश**

*(जुना क्र. नि.फौ.ख.क्र. २६३/१९८८)*

*(सरकार वि. मेहफुजअली)*

(आदेश पारित दिनांक १६ मार्च, २०२६)

**०१.** प्रस्तुतच्या खटल्याचे अवलोकन केले. फौ.प्र.संहीताचे कलम २३९ चे वाचन केले. सरकारी वकीलांचा यूक्तीवाद ऐकला.

**०२.** प्रस्तुतचा खटला हा आरोपीविरुद्ध भारतीय दंड विधानचे कलम ३०४ (अ) व मोटार वाहन कायद्याचे कलम ८९ (ब)/११२ अन्वयेच्या गुन्हयाकरिता दाखल केला आहे.

**०३.** प्रस्तुत प्रकरणामध्ये सरकार तर्फे फिर्यादी पोलीस हेड कॉन्स्टेबल श्रीराम यांनी दिनांक २३/०५/१९८८ रोजी फिर्याद दिली की, अज्ञात कारचालकाने त्याची कार हयगयीने, निष्काळजीपणे व वेगाने चालवुन अमित रमेश कांबळे यास धडक देऊन जखमी केले व त्याद्वारे त्याच्या मृत्युस कारणीभुत झाला. प्रस्तुत प्रकरणातील आरोपी हा फरार असल्यामुळे उपरोक्त आरोपांच्या अनुषंगाने अभियोगपक्षाने फौजदारी प्रक्रीया संहीताचे कलम २९९ अंतर्गत पुरावा नोंदविण्यास सुरुवात केली. त्याकरिता अभियोग पक्षाने फिर्यादी पोलीस हेड कॉ. श्रीराम शेंडे, पंच साक्षीदार शंकर लक्ष्मण पाटील, हुसैन श्रीपतराव फूलझेले, महेंद्र चिंतामण धुर्वे व जनार्धन दाजीबा येलेकर, तसेच साक्षीदार सुधाकर निलकंठ कांबळे, दिगांबर गणपतराव नगराळे, अशोक बापुराव कांबळे, रविंद्र ताराचंद भगत, महादेव गवतु कांबळे, रमेश रामदास कांबळे, सिद्धार्थ महादेवराव कांबळे, रत्नमाला रमेश कांबळे, मारोती श्रावण कांबळे, गणपत कृष्णाजी मेश्राम, तसेच वैद्यकीय अधिकारी डॉ. ए.एच. टाक, पोलीस साक्षीदार पोलीस कॉ. त्र्यंबक व–हाडे, पो.कॉ. वसंतराव सालोकर, पी.एस.आय. के.के सिद्धीकी व हेड कॉ. मंगललाल छोटेलाल पुरदिवा यांना साक्ष समंस पाठविले. त्यांचे अहवाल नि.क्र. २ ते २१ वर दाखल आहे. त्यानुसार उपरोक्त साक्षीदार हे दिलेल्या पत्यावर मिळून आले नाहीत. सदर कारणांची शहानिशा करण्याकरिता बजावणी अधिकारी पोलीस हवालदार सचिन महादेव इंगळे यांचा जबाब सुध्दा नोंदविण्यात आला. सबब, अभियोगपक्ष त्यांची साक्ष नोंदवु शकले नाही. त्यामुळे आरोपींवरील आरोप सिद्ध

करण्याकरिता अभियोगपक्ष प्रस्तुत प्रकरणामध्ये फिर्यादी व इतर महत्वाच्या साक्षीदारांचा पुरावा अभिलेखावर आणण्यास सक्षम नसल्याचे दिसुन येत आहे. याव्यतिरिक्त, प्रस्तृत प्रकरणातील मृतकास अज्ञात व्यक्तीच्या कारने धडक दिली. त्यामुळे घटनेच्या वेळेस आरोपी हाच तथाकथीत कार चालवित होता, याबाबत घटनेबाबतच्या साक्षीदारांकडुन ओळख पटवुन त्याबाबत शहानीशा तपासादरम्यान होणे आवश्यक होते. परंतु प्रस्तृत प्रकरणात तपासी अधिकारी यांनी तसे काहीएक केलेले दिसुन येत नाही. त्यामुळे सुद्धा घटनेच्या वेळेस आरोपी हाच सदर मोटरसायकल चालवित होता हे संशयापलीकडे सिद्ध होतांना दिसुन येत नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणामध्ये आरोपीने त्याच्या ताब्यातील तथाकथीत कार ही हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन मृतक अमित रमेश कांबळे यास धडक दिली व त्याद्वारे त्याच्या मृत्यस कारणीभुत झाला, हे संशयापलीकडे सिद्ध होणे शक्य नाही. त्यामुळे सुद्धा भारतीय दंड विधानचे कलम३०४ (अ) व मोटार वाहन कायद्याचे कलम ८९ (ब)/११२ अन्वयेच्या गुन्हयाकरिता आरोपीला दोषी धरणे शक्य नाही. अशा परिस्थीतीमध्ये प्रस्तुतचे ३८ वर्ष जूने प्रकरण प्रलंबीत ठेवण्यामध्ये कुठलेही कारण दिसुन येत नाही. त्यामूळे आरोपीला प्रस्तुत प्रकरणातील आरोपातुन दोषमुक्त करुन प्रकरण निकाली काढणे आवश्यक आहे. सबब, खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. आरोपीला भारतीय दंड विधानचे कलम ३०४ (अ) व मोटार वाहन कायद्याचे कलम ८९ (ब)/११२ अन्वयेच्या गुन्हयाच्या आरोपातुन फौजदारी प्रक्रीया संहीताचे कलम २३९ अन्वये दोषमुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे प्रलंबीत वॉरंट संबंधीत लिपीक यांनी परत मागवावे.

३. येणेप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात यावेत.

VISHAL HARIBHAU KHEDKAR
Digitally signed by VISHAL HARIBHAU KHEDKAR
Date: 2026.03.16 17:37:57 +0530

दि. १६/०३/२०२६ (व्ही. एच. खेडकर)

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, हिंगणा.